**M.I.D.C. पोलीस स्टेशन, जळगाव**
**ता. जि. जळगाव राज्य – महाराष्ट्र**
e - mail :- pstn.midc@gmail.com
**दुरध्वनी** – 0257- 2210500,

**M.I.D.C. पो.स्टे. / जा.क्र. /** /2026 **Date:** 07 / 04 /2026

एमआयडीसी पोलीस स्टेशन
दिनांक 07/04/2026

**प्रति**

**मा. संपादक**

-----------------------------

**विषय** - शेतकऱ्यांच्या विहीरीवरील व बोरवेअर वरील केबल चोरी करणारे चोरटे एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव कडून जेरबंद.

दिनांक 30/03/2026 रोजी दुपारी 04.00 वाजेचे सुमारास फिर्यादी नवल भटू गुंजाळ , वय - 31 वर्षे , धंदा - शेती रा. लमांजन ता.जि. जळगांव यांचे तसेच इतर साक्षीदार यांचे लांजन ता. जि. जळगांव शिवारातील शेतात कोणी तरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीने बटाई केलेल्या शेतातील व आजू बाजूचे शेतकरी यांच्या शेतातील विहीरी तसेच बोरवेल वर लावलेल्या मोटारींच्या विजेच्या तांब्याचे तार असलेल्या वायरी एकुण 19,000/- रुपये किंमतीच्या जुन्या वापरत्या असा मुद्देमाल फिर्यादी व साक्षीदार यांचे संमत्ती वाचून लबाडीच्या इराद्याने चोरून नेला वगैरे मजकुराच्या फिर्याद वरून एम. आय. डी. सी. पोलीस स्टेशनला गु.र.नं. 234/2026 भा.न्या.सं. 2023 चे कलम 303(2),303(5), 317(2) प्रमाणे दिनांक 31/03/2026 रोजी 00.48 वाजता गुन्हा दाखल आहे.

एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस स्टेशन चे स.पो.नि. गणेश वाघ , पो.हे.कॉ. 2735 ईश्वर लोखंडे , पो.हे.कॉ. 186 समाधान टहाकळे , पो.हेकॉ. 614 किरण पाटील , पो.कॉ. 1683 कैलास पाटील , पो.कॉ. 2048 राहुल बोरसे अशांना तात्काळ आवश्यक त्या सुचना देवुन कारवाई करणे बाबत सुचना दिल्या. त्या प्रमाणे वर नमुद पथकाने गोपनिय बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेशनाच्या मदीतने दिनांक ३१/३/२०२६ रोजी सदर गुन्हा करणारे संशईत आरोपी नामे 1) अनिल कर्तार भिल्ल 2) संदीप सुभाष देवरे, रा. नागदुली ता. एरंडोल ३) आनंदा शांतारा कोळी रा. वाकडी ता.जि.जळगाव यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कडेस गुन्हया बाबत विचारपुस केली त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीतांना अटक करुन मा न्यायालया समक्ष हजर केले असता मा न्यायालयाने त्यांची दोन दिवस पोलीस कोठडी रिमांड दिली आहे. पो.क. रिमांड मध्ये आरोपीतांकडेस कसुन चौकशी केली असता त्यांचे कडुन खालील प्रमाणे किंमतीचा व वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

1) 3,000/- रुपये किमतीची 30 मीटर लांबीची विजेची कॉपर वायर 100 रुपये प्रती मिटर
2) 5000/- रुपये किंमतीची 5 किलो वजनाचे तांब्याचे तार वायर जाळुन त्यातुन काढलेले तांबे

एकुण- 8,000/- रु कि चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. 2735 ईश्वर लोखंडे व पोकॉ राहुल बोरसे व पो.कॉ. कैलास पाटील हे करीत आहे.

सदरची कारवाई डॉ.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे

**(बबन आव्हाड )**
**पोलीस निरीक्षक**
**एम आय.डी.सी. पो.स्टे. जळगाव**